**असुधारित प्रत**

# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## मंगळवार, दिनांक १५ डिसेंबर, २०२०

## ( सकाळी ११.०० वाजता )

**एक** : (अ) अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक १२ ते ४१ सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

(ब) तारांकित प्रश्नांबाबतची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे -

(१) **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** : **"एड्स नियंत्रणासाठी काम करणाऱ्या संस्थांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत"** या विषयावरील श्री.सुनिल प्रभू व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ४४२४३ ला दिनांक १६ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अनुपुरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(२) **आदिवासी विकास मंत्री** : **"राज्यातील आदिवासी आश्रमशाळांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त असल्याबाबत"** या विषयावरील ॲड.भिमराव धोंडे व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ५३१८८ ला दिनांक ४ एप्रिल, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अनुपुरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**दोन** : **कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

(१) **मुख्यमंत्री** : महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(२) **उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री** : (क) महाराष्ट्र राज्य वित्त आयोगाचा पाचवा अहवाल व स्पष्टीकरणात्मक ज्ञापन सभागृहासमोर ठेवतील.

(ख) महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या कलम-६ (१) नुसार सन २०२०-२०२१ च्या अर्थसंकल्पाच्या संदर्भात जमा व खर्चाच्या अर्धवार्षिक आढाव्याचे निष्कर्ष दर्शविणारे विवरणपत्र तसेच अधिनियमातील कलम ६(२) व ६(३) नुसार निवेदन सभागृहासमोर ठेवतील.

**(३) उद्योग मंत्री** : मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित, औरंगाबाद यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा बावन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(४) कामगार मंत्री** : (क) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचा सन २०१६-२०१७ व सन २०१७-२०१८ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) औरंगाबाद जिल्हा माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार मंडळ, औरंगाबाद यांचा सन २०१४-१५,२०१५-१६ या वर्षांचा तेविसावा व चोविसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ग) नाशिक जिल्हा माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार मंडळ, नाशिक यांचा सन २०१६-२०१७, २०१७-२०१८ या वर्षांचा अठ्ठाविसावा व एकोणतिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(घ) दि खोका मेकिंग ॲण्ड टिंबर मार्केट लेबर बोर्ड, मुंबई यांचा सन २०१४ ते २०१८ या वर्षांचे अनुक्रमे बेचाळीसावा, त्रेचाळीसावा, चव्वेचाळीसावा व पंचेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ङ) सुरक्षा रक्षक मंडळ, बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा यांचे सन २०१५-२०१६ व २०१६-२०१७ या वर्षांचे पस्तीसावा व छत्तीसावा सभागृहासमोर ठेवतील.

(च) नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, नाशिक यांचे सन २०१४-२०१५ व २०१५-२०१६ या वर्षांचे अकरावा व बारावा सभागृहासमोर ठेवतील.

(छ) अहमदनगर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, अहमदनगर यांचे सन २०१४-२०१५, २०१५-२०१६ व २०१६-२०१७ या वर्षांचे सभागृहासमोर ठेवतील.

(ज) नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, नागपूर यांचे सन २०१०-२०११, २०११-२०१२, २०१२-२०१३, २०१३-२०१४ व २०१४-२०१५ या वर्षांचे सदतीसावा, अडतीसावा, एकोणचाळीसावा, चाळीसावा व एक्केचाळीसावा सभागृहासमोर ठेवतील.

(झ) रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, रायगड यांचे सन २०१६-२०१७ या वर्षाचा पंधरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(त्र) सांगली जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, सांगली यांचे सन २०१३-२०१४, २०१४-२०१५, २०१५-२०१६, २०१६-२०१७, २०१७-२०१८ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहसमोर ठेवतील.

(ट) पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, पुणे यांचे सन २०१४-२०१५ व २०१५-२०१६ या वर्षांचे बारावा व तेरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(५) जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री** : (क) सन २०१६ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनामध्ये "खडकवासला कालव्याचे नुतनीकरण आणि अस्तरीकरण करणे, ६.५ टीएमसी पेक्षा जास्त वापरले गेलेले पाणी

शुध्दीकरण करून मुठा उजवा कालव्यात सोडणे तसेच मुळशी (टाटा) धरणाचे पाणी पिण्याच्या पाण्यासाठी राखीव ठेवणे" या विषयावरील ॲड.राहूल कुल, वि.स.स. यांची दिनांक १७ मार्च, २०१६ रोजी उत्तरीत झालेल्या लक्षवेधी सूचनेवरील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतील.

(ख) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा अलग लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ग) कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचे वार्षिक वित्तीय अहवाल व सन २०१७-२०१८ या कालावधीच्या लेख्यावरील भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांचा स्वतंत्र लेखापरीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(घ) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(६) अन्न व औषध प्रशासन मंत्री** : हाफकिन जीव - औषध निर्माण महामंडळ मर्यादित यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा चव्वेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(७) ग्रामविकास मंत्री** : सन २०१६-२०१७ चा महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील सेहेचाळीसावा लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(८) पशुसंवर्धन मंत्री** : महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (९) | **वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री** | : | (क) | महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा त्रेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |
| | | | (ख) | महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचा सन २०१९ या वर्षाचा एकविसावा वार्षिक अहवाल व सन २०१८-२०१९ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील. |
| (१०) | **कृषि मंत्री** | : | | महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१६-२०१७ व सन २०१७-२०१८ या वर्षाचे एकावन्नावा व बावन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |
| (११) | **वने मंत्री** | : | | महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा सेहेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |
| (१२) | **पणन मंत्री** | : | | महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा बासष्ठावा वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |
| (१३) | **संसदीय कार्य मंत्री** | : | | विधानसभेच्या सन २०२० च्या तिसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात दिनांक ७ सप्टेंबर, २०२० व दिनांक ८ सप्टेंबर, २०२० या कालावधीत मा.मंत्री/ मा. राज्यमंत्री महोदयांनी विधानसभा सभागृहात दिलेल्या एकूण ०३ आश्वासनांची यादी तसेच, सन २०२० चे तिसरे (पावसाळी) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर, आतापर्यंत पूर्तता करण्यात आलेल्या एकूण १८५ आश्वासनांच्या पूर्ततेची विवरणपत्रे यादीसह सभागृहाच्या पटलावर ठेवतील. |
| (१४) | **वस्त्रोद्योग मंत्री** | : | | महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, नवी मुंबई यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा सत्तेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |

**तीन : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळावर विधानसभा सदस्यांची नामनियुक्ती करण्याबाबत उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांचा प्रस्ताव -**

"यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अधिनियम, १९८९ च्या कलम १६ अन्वये करण्यात आलेल्या परिनियमातील खंड ६(१)(जे) अन्वये उपरोक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळावर (१) श्री.सुहास (आण्णा) कांदे, वि.स.स. व (२) कु.सरोज बाबुलाल आहिरे, वि.स.स. यांची नामनियुक्ती करण्यात यावी."

**चार : मा.समिती प्रमुख, विधानसभा विशेषाधिकार समिती यांचा प्रस्ताव**

विधानसभा विशेषाधिकार समितीकडे विचारार्थ प्रलंबित असलेल्या,

(१) सन्माननीय विधानसभा सदस्य श्री.प्रताप सरनाईक यांनी श्री.अर्णब गोस्वामी, संपादक, वृत्त निवेदक व कार्यक्रम सूत्र संचालक, रिपब्लिक टिव्ही वृत्तवाहिनी यांचेविरुद्ध दिनांक ७ सप्टेंबर, २०२० रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण.

(२) सन्माननीय विधानसभा सदस्य श्री.प्रताप सरनाईक यांनी हिंदी सिने अभिनेत्री कंगना राणावत यांचेविरुद्ध दिनांक ७ सप्टेंबर, २०२० रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण.

या दोन प्रकरणांवरील विशेषाधिकार समितीचे अहवाल सादर करण्याकरिता महाराष्ट्र विधानसभा नियम १८३(१) च्या परंतुकान्वये पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मुदत वाढवून देण्यात यावी.

**पाच : उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांचा म.वि.स. नियम ५७ अन्वये प्रस्ताव :-**

"पुरवणी मागण्यांवरील चर्चा व मतदानाच्या संदर्भात विधानसभा नियमांतील नियम २६० (२) मधील तीन दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे ती महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम ५७ अन्वये स्थगित करण्यात यावी."

**सहा : सन २०२०-२०२१ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान. (पहिला व शेवटचा दिवस)**

(१) गृह विभाग

(२) महसूल व वन विभाग

(३) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

(४) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

(५) नगरविकास विभाग

(६) सार्वजनिक बांधकाम विभाग

(७) जलसंपदा विभाग

(८) ग्रामविकास विभाग

(९) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

(१०) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

(११) नियोजन विभाग

(१२) सार्वजनिक आरोग्य विभाग

(१३) आदिवासी विकास विभाग

(१४) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

(१५) महिला व बाल विकास विभाग

(१६) इतर मागास बहुजन कल्याण विभाग

**( मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे )**
**[ चर्चारोध (गिलोटीन) सायंकाळी ०६.०० वाजता ]**

**सात : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ, विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ५४ – महाराष्ट्र (तृतीय पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२०.

---

**(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

(१) (क) **सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ५३ – महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ विधेयक, २०२०.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ५३ – महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ विधेयक, २०२० विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२)** (क) **सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ४९ – डी. वाय. पाटील कृषी व तंत्र विद्यापीठ, तळसंदे, कोल्हापूर विधेयक, २०२०.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ४९ – डी. वाय. पाटील कृषी व तंत्र विद्यापीठ, तळसंदे, कोल्हापूर विधेयक, २०२० विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(३)** (क) **सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ५० – महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२०.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ५० – महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२० विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(४) **सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ४८ – मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२०.**

---

(५) (क) **सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ४६ – महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२०.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ४६ – महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२० विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(६) (क) **सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ४७ – मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२०.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ४७ – मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२० विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(७) (क) **सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ४४ – महाराष्ट्र सहकारी संस्था (चौथी सुधारणा) विधेयक, २०२०.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ४४ – महाराष्ट्र सहकारी संस्था (चौथी सुधारणा) विधेयक, २०२० विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(८) (क) **सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ४५ — महाराष्ट्र सहकारी संस्था (पाचवी सुधारणा) विधेयक, २०२०.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ४५ — महाराष्ट्र सहकारी संस्था (पाचवी सुधारणा) विधेयक, २०२० विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(९) (क) **सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१ — शक्ती फौजदारी कायदे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२०.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१ — शक्ती फौजदारी कायदे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२० विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.चंद्रकांत पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१ — शक्ती फौजदारी कायदे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२० विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(१०) (क) **सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ५२ — महाराष्ट्र अनन्य विशेष न्यायालये (शक्ती कायद्याखालील महिलांच्या व बालकांच्या विरुध्दच्या विवक्षित अपराधांसाठी) विधेयक, २०२०.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ५२ – महाराष्ट्र अनन्य विशेष न्यायालये (शक्ती कायद्याखालील महिलांच्या व बालकांच्या विरुध्दच्या विवक्षित अपराधांसाठी) विधेयक, २०२० विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.चंद्रकांत पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ५२ – महाराष्ट्र अनन्य विशेष न्यायालये (शक्ती कायद्याखालील महिलांच्या व बालकांच्या विरुध्दच्या विवक्षित अपराधांसाठी) विधेयक, २०२० विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

## " राष्ट्रगीत "

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १४ डिसेंबर, २०२०

**राजेन्द्र भागवत,**
सचिव,
महाराष्ट्र विधानसभा